# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.

तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet : www.dte.org.in


अत्यंत महत्वाचे

तातडीचे

क्रमांक : 10/एनजीपी/पदविका/प्रवेश/2013-14/335

दिनांक : 30.5.2013

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष 2013 - 14 पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या मान्यतेनुसार अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र तंत्रनिकेतनात नवीन पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास, सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करण्यास तसेच पदविका अभ्यासक्रमांच्या नवीन संस्था सुरु करण्यास शासन मान्यता देण्याबाबत..

संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मान्यता 2013/(81/13) तांशि 5, दि. 15.5.2013

उपरोक्त विषयाचा संदर्भाधीन शासन निर्णय पहावा. शासन निर्णयाची प्रत संचालनालयाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आलेली आहे.

सदर शासन निर्णयातील अ.क्र. 14 वरील, ज्या संस्थांनी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद नवी दिल्ली यांच्या राज्य शासनामार्फत प्रस्ताव सादर न करता थेट प्रस्ताव सादर केले असतील तसेच ज्या संस्थांना राज्य शासनाची नकारात्मक शिफारस आहे, अशा संस्थांना मान्य झालेल्या अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत राबविण्यात येणारी फी प्रतिपूर्तीची योजना लागू राहणार नाही., ही अट नमूद करण्यात आलेली आहे. सदर अटीनुसार शासन निर्णयातील ज्या संस्थांना प्रवेशक्षमता वाढ/ नवीन अभ्यासक्रम मंजूर करण्यात आलेले आहेत, त्या अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फी प्रतीपूर्ती योजना लागू राहणार नाही. ही बाब सदर शासन निर्णयामध्ये नमूद आपल्या अधिपत्याखालील संस्थांच्या निर्देशनास आणण्यात यावी. त्यानुसार शासन निर्णयामध्ये नमूद संस्थांनी सदर माहिती संस्थांच्या संकेतस्थळावर अद्ययावत करण्याबाबतही संबंधीत संस्थांना तात्काळ सूचीत करण्यात यावे. तसेच त्याप्रमाणे प्रसिध्दी देण्याबाबतही संबंधीत संस्थांना कळवावे. संकेतस्थळावर सदर माहिती तातडीने अद्ययावत करणे आवश्यक असून, संस्थांकडून माहिती अद्ययावत करुन घेण्याची जबाबदारी आपली राहिल याची कृपया नोंद घ्यावी. तसेच संबंधीत संस्थांनी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या जाहिरातीत ज्या अभ्यासक्रमांना फी प्रतिपूर्ती लागू राहणार नाही, याचा उल्लेख असणे आवश्यक आहे, याबाबतही सूचना देण्यात याव्यात.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक क्रमांक ....4359....
दिनांक ...3 JUN 2013...

(दयानंद मेश्राम)

प्र.संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई

क्र.तंशिस/प्राकाना/शैवि२/प्रवेश/२०१३/1641

दि. 4 JUN 2013

प्रति,

प्राचार्य,

सर्व अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ वास्तूशास्त्र/ एचएमसीटी

पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था.

नागपूर विभाग.

त्यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रातील सूचनांची नोंद घेऊन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागिय कार्यालय,

नागपूर